# 'एनआरडीसी'चा विश्वकर्माबरोबर करार

म. टा. प्रतिनिधी, पुणे

> समकालीन समस्यांवर उपाय शोधण्यासाठी विश्वकर्मा विद्यापीठ कायम कटिबद्ध आहे, असे अगरवाल यांनी सांगितले. 'एनआरडीसी'सोबतचे सहकार्य या मॉडेलला अधिक बळकट करील आणि अर्थपूर्ण बदल घडवण्याच्या क्षमतेत वृद्धी करील.
>
> \- डॉ. सिद्धार्थ जबडे, कुलगुरू, विश्वकर्मा विद्यापीठ

सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी तंत्रज्ञान आणि नवकल्पनांचा उपयोग करण्यासाठी राष्ट्रीय संशोधन विकास महामंडळ (एनआरडीसी) आणि विश्वकर्मा विद्यापीठाने गुरुवारी करार केला. संशोधन आणि उद्योग यांच्यातील दरी भरून काढण्यासाठी हा करार महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रसंगी 'एनआरडीसी'चे संचालक शेखर मुंदडा, पुणे केंद्राचे सहायक व्यवस्थापक मनजित लाड, विद्यापीठाचे अध्यक्ष भरत अगरवाल, कुलगुरू डॉ. सिद्धार्थ जबडे, उपस्थित होते. या कराराच्या माध्यमातून तंत्रज्ञानाच्या विकासास गती देणे आणि त्याचे व्यावसायीकरण करण्याचा आहे. त्यामुळे सामाजिक-आर्थिक लाभ मिळू शकतील. दोन्ही संस्था एकत्र आणून या उद्दिष्टांना साध्य करण्यासाठी प्रयत्न केले जातील. 'एनआरडीसी'च्या माध्यमातून संशोधन संस्थांमधून पुढे आलेल्या अत्याधुनिक तंत्रज्ञानांचा प्रसार, संवर्धन आणि व्यावसायीकरणासाठी प्रयत्न केले जातात. या कराराच्या माध्यमातून विश्वकर्मा विद्यापीठ एनआरडीसीसोबत सहकार्य करून संशोधन आणि उद्योग यांच्यातील दरी भरून काढेल. त्याचप्रमाणे प्रभावी नवकल्पना पुढे आणेल. या करारावर 'एनआरडीसी'चे मुंदडा आणि विश्वकर्मा विद्यापीठाचे अग्रवाल यांनी स्वाक्षरी केली.

'सामाजिक समस्यांवर उपाय शोधण्यासाठी तंत्रज्ञान विकसित करण्याच्या दिशेने विश्वकर्मा विद्यापीठाचे प्रयत्न कौतुकास्पद आहेत. विद्यापीठाने विविध क्षेत्रांत ३०० हून अधिक तंत्रज्ञान विकसित केले आहे. स्टार्टअपना आधार देऊन, त्यांची वाढ सुनिश्चित करण्यासाठी सहकार्य करणार आहोत,' असे मुंदडा यांनी सांगितले.

4

Today's (13 Sept 2024)Maharashtra Times